# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

NSS ATR 2019-20

NSS ANNUAL ACTIVITY

## International Yoga Day : 06 June 2019










जागतिक योगा डे निमित्त योगा करीत असलेले दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीराम सोळंके, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

---

**One Tree One Student tree Plantation**
**Date-02.08.2019**










'एक विद्यार्थी एक वृक्ष आणि वृक्ष दत्तक योजना' या नाविण्यपूर्ण उपक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून वसुंधरा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष व राष्ट्रीय पर्यावरण समितीचे सदस्य प्रा.योगेश शर्मा यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी उपस्थित असलेले महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अशोक शेलगेनवार, डॉ.राजाराम पवार, डॉ.ब्रिजमोहन दायमा, डॉ.मनीषा आष्टेकर व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.साईनाथ उमाटे.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

दयानंद शिक्षण संस्था,लातूर

"अ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः"

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

**Swachta Abhiyan & Tree Plantation**
**Date- 15.08.2019**







मराठवाडा नेता

Saturday 2019/08/17

**दयानंद वाणिज्य महाविद्यालयात वृक्षारोपण**

लातूर : येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा आणि स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.एकच लक्ष्य, तेहतीस कोटी वृक्षया महाराष्ट्र शासनाच्या योजनेचा भाग म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी दयानंद महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी स्वच्छता मोहिमेसोबतच विविध प्रकारच्या पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार,वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. राजाराम पवार, आयक्यूएसी प्रमुख डॉ. ब्रिजमोहन दायमा,प्रा.विशाल वर्मा,रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे,राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख प्रा.बालाजी कांबळे, रासेयो सहकार्यक्रमाधिकारी प्रा.आकांक्षा भांजी,प्रा.अक्षय पवार,प्रा.नीलेश क्षीरीसागर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

मराठवाडा नेता



दैनिक आनंद नगरी

लातूर नगरी

Sunday 2019/08/18

**दयानंद वाणिज्य महाविद्यालयात वृक्ष लागवड**

लातूर:- येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा आणि स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.'एकच लक्ष्य, तेहतीस कोटी वृक्ष'या महाराष्ट्र शासनाच्या योजनेचा भाग म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी दयानंद महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी स्वच्छता मोहिमेसोबतच विविध प्रकारच्या पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार,वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. राजाराम पवार, आयक्यूएसी प्रमुख डॉ. ब्रिजमोहन दायमा,प्रा.विशाल वर्मा,रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे,राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख प्रा.बालाजी कांबळे, रासेयो सहकार्यक्रमाधिकारी प्रा.आकांक्षा भांजी,प्रा.अक्षय पवार,प्रा.नीलेश क्षीरीसागर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

'एकच लक्ष्य, तेहतीस कोटी वृक्ष' या उपक्रमांतर्गत 'स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा' व स्वातंत्र्य दिनानिमित्त दयानंद शिक्षण संस्थेच्या परिसरात ५० वृक्षांची लागवड करण्यात आली.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

NSS ATR 2019-20

NSS ANNUAL ACTIVITY

दयानंद शिक्षण संस्था,लातूर

"अ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः"

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

## Sadbhavna Din & Oath Ceremony

**Date-20.08.2019**





# दयानंद वाणिज्य मध्ये सदभावना दिवस साजरा

**लातूर : प्रतिनिधी**

येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारताचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांच्या जयंती दिनानिमित्त हा दिवस सदभावना दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार होते. यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. राजाराम पवार, आयक्यूएसी प्रमुख डॉ. ब्रिजमोहन दायमा, क्रीडा प्रमुख डॉ. अशोक वाघमारे, सांस्कृतिक प्रमुख डॉ. बाळासाहेब चव्हाण, प्रा. विशाल वर्मा, डॉ. मनीषा आष्टेकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, रासेयो सहकार्यक्रमाधिकारी प्रा. आकांक्षा भांजी, प्रा. योगेश शर्मा, प्रा.अक्षय पवार, प्रा. निलेश क्षीरसागर, प्रा. विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांनी सदभावना दिवसानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांना सद्भावना दिवसाची प्रतिज्ञा दिली.

अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. शेलगेनवार म्हणाले की, देशातील विविध प्रदेशातील अनेक धर्माच्या व अनेक भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये एकमेकाविषयी ऐक्याची भावना, सौहार्द भाव वृद्धिंगत करणे व हिसाचार टाळणे हे प्रमुख उद्दिष्टे सदभावना दिवस साजरा करण्याचे असल्याचे डॉ. शेलगेनवार म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक वाघमारे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार डॉ. साईनाथ उमाटे यांनी मानले. यावेळी राजेश सेलूकर, शिवाजी पांचाळ यांच्यासह सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ



लातूर : सद्भावना दिनानिमित्त दयानंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मंगळवारी सामुदायिक शपथ घेतली.

# ऐक्याची भावना ठेवा, मानवता जोपासा

## विद्यार्थ्यांना संदेश; सामुदायिक शपथ घेत दयानंद महाविद्यालयात सद्भावना दिन

लातूर, ता. २० : भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. अनेक धर्मांचे, वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक भारतात राहतात. त्यामुळे एकमेकांविषयी ऐक्याची भावना ठेवा, ती वृद्धिंगत करा. हिंसाचार हे उत्तर नाही. मानवता जोपासा... असा संदेश दयानंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सद्भावना दिनानिमित्ताने देण्यात आला, तशी शपथही घेण्यात आली.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार, विभागप्रमुख डॉ. राजाराम पवार, डॉ. ब्रिजमोहन दायमा, क्रीडाप्रमुख डॉ. अशोक वाघमारे, सांस्कृतिक प्रमुख डॉ. बाळासाहेब चव्हाण प्रा. विशाल वर्मा, डॉ. मनीषा आष्टेकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, सहकार्यक्रमाधिकारी प्रा. आकांक्षा भांजी, प्रा. योगेश शर्मा, प्रा.अक्षय पवार, प्रा. नीलेश क्षीरसागर, प्रा. विठ्ठल जाधव उपस्थित होते. डॉ. उमाटे यांनी विद्यार्थ्यांना सद्भावना दिवसाची प्रतिज्ञा दिली.

दयानंद कला महाविद्यालयात प्रतिज्ञा व मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील ४७८ विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड यांनी सद्भावना दिनानिमित्त प्रतिज्ञा दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला. यावेळी गायकवाड म्हणाले, इतरांबद्दल चांगले विचार ठेवून प्रत्येकाने एकमेकांशी सहकार्याने वागावे. जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषाविषयक भेद मनात बाळगू नका. यावेळी उपप्राचार्य अनिल माळी, पर्यवेक्षक दिलीप नागरगोजे, कार्यक्रमाधिकारी डॉ. संतोष पाटील, डॉ. संदीप जगदाळे, डॉ. शिवकुमार राऊतराव, डॉ. अंजली जोशी उपस्थित होते.

Aurangabad, Latur-Today
21/08/2019 Page No. 4

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

दयानंद शिक्षण संस्था,लातूर

"आ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः"

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

---

**Yuva Mahiti Dut Workshop**

**Date-22.08.2019**







दैनिक आनंद नगरी

लातूर नगरी

Saturday 2019/08/24

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयात युवा माहिती दूत कार्यशाळा

**लातूर/प्रतिनिधी:** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२२ ऑगस्ट रोजी 'युवा माहिती दूत' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार होते. यावेळी मंचावर अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम)या गैर शासकीय संस्थेमध्ये कार्यरत असलेले श्री शैलेश ततापुरे व सौ.वैशाली अपसंगेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

युनिसेफच्या सहकार्याने राज्य शासनाचे उच्च शिक्षण विभाग आणि तंत्र शिक्षण विभाग यांच्या सहभागाने माहिती व जनसंपर्क महासंचालयाने 'युवा माहिती दूत' हा उपक्रम हाती घेतला आहे. महाविद्यालयातील युवकांमार्फत शासकीय योजनांची माहिती सामान्य व्यक्तीपर्यंत थेटपणे पोहचविणे हा प्रमुख उद्देश 'युवा माहिती दूत'या उपक्रमाचा असल्याचे मत कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ साईनाथ उमाटे यांनी सांगितले यावेळी शैलेश ततापुरे व सौ.वैशाली अपसंगेकर यांनी सरकारच्या युवा माहिती दूत या उपक्रमाबद्दल चे सखोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.तसेच त्यांनी युवा माहिती दूत हा मोबाईल ॲप कसा डाऊनलोड करायचा व त्यातील शासकीय योजनांची माहिती लाभार्थ्यांना कशी पोहोचवायची याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. सदरील कार्यशाळेत २२१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

शासनाच्या योजनांची माहिती ग्रामीण भागातील अशिक्षित व अर्धशिक्षित लाभार्थ्यांन पर्येत त्यांच्यासाठी असलेल्या योजनांची माहिती पोहचविण्यासाठी समाज कार्याची आवड असलेल्या उत्साही तरुण वर्गाने या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. अशोक शेलगेनवार यांनी केले. सदरील कार्यशाळेत रासेयो चे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.



### दयानंद 'वाणिज्य'मध्ये 'युवा माहिती दूत' कार्यशाळा

*प्रतिनिधी / २३ ऑगस्ट*

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२२ ऑगस्ट रोजी 'युवा माहिती दूत' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार होते. यावेळी मंचावर अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम)या अशासकीय संस्थेमध्ये कार्यरत असलेले शैलेश ततापुरे व श्रीमती वैशाली अपसंगेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. युनिसेफच्या सहकार्याने राज्य शासनाचे उच्च शिक्षण विभाग आणि तंत्र शिक्षण विभाग यांच्या सहभागाने माहिती व जनसंपर्क महासंचालयाने 'युवा माहिती दूत' हा उपक्रम हाती घेतला आहे. महाविद्यालयातील युवकांमार्फत शासकीय योजनांची माहिती सामान्य व्यक्तीपर्यंत थेटपणे पोहचविणे हा प्रमुख उद्देश या उपक्रमाचा असल्याचे मत कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांनी सांगितले. यावेळी शैलेश ततापुरे व श्रीमती वैशाली अपसंगेकर यांनी सरकारच्या युवा माहिती दूत या उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी युवा माहिती दूत हा मोबाईल ॲप कसा डाऊनलोड करायचा व त्यातील शासकीय योजनांची माहिती लाभार्थ्यांना कशी पोहोचवायची याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. सदरील कार्यशाळेत २२१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शासनाच्या योजनांची माहिती ग्रामीण भागातील अशिक्षित व अर्धशिक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी समाज कार्याची आवड असलेल्या उत्साही तरुण वर्गाने या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्षीय समारोपात डॉ. अशोक शेलगेनवार यांनी केले. सदरील कार्यशाळेत रासेयोचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

युनिसेफच्या सहकार्याने राज्य शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या सहभागाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने राबविलेल्या 'युवा माहिती दुत' या उपक्रमांतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मा.शैलेश तत्तापुरे व मा.वैशाली अपसिंगेकर.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

### Blood Donation Camp

**Date-04.09.2019**





**मराठवाडा नेता**

Friday 2019/09/06

## दयानंद वाणिज्यमध्ये १०९ जणांचे रक्तदान

### डॉ.भालचंद्र ब्लड बँक व राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम



लातूर, दि. ५ :....

येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लातूर येथील डॉ. भालचंद्र ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद वाणिज्य महाविद्यालयात दि.४ सप्टेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी असा एकूण १०९ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या शिबिराचे उदघाटन दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य अजिंक्यजी सोनवणे, विशालजी अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार हे होते. यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. राजाराम पवार, आयक्यूएससी प्रमुख डॉ. ब्रिजमोहन दायमा,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. योगेश गावसाने,डॉ. प्रशांत चेगे, दिगंबर पवार,किशोर पवार यांची मंचावर उपस्थिती होती.

मराठवाडा नेता

दैनिक **आनंद नगरी**

**लातूर नगरी**

Friday 2019/09/06

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात १०९ जणांचे रक्तदान



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लातूर येथील डॉ. भालचंद्र ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद वाणिज्य महाविद्यालयात दि.४ सप्टेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक,विद्यार्थी, शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी असा एकूण १०९ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या शिबिराचे उदघाटन दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य अजिंक्य सोनवणे, विशाल अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार हे होते. यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. राजाराम पवार, आयक्यूएससी प्रमुख डॉ. ब्रिजमोहन दायमा,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. योगेश गावसाने,डॉ. प्रशांत चेगे, दिगंबर पवार,किशोर पवार यांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अशोक शेलगेनवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रक्तदान शिबिराचे महत्त्व सांगून अधिकाधिक विद्यार्थ्यांना रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

उल्लेखनीय बाबा म्हणजे सदरील शिबिरामध्ये डॉ. मनीषा आष्टेकर,प्रा.आकांक्षा भांजी,प्रा. लक्ष्मीकांत सोनी,प्रा.पूनम चवळे,सुमित जोशी, सोमनाथ घोडके आदींनी स्वतः रक्तदान करून रक्तदात्यांचा उत्साह द्विगुणित केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. साईनाथ उमाटे यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रा.निलेश क्षीरसागर यांनी केले. सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. मनीषा आष्टेकर, रासेयो. कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, सहकार्यक्रमाधिकारी प्रा.आकांक्षा भांजी, प्रा.योगेश शर्मा,प्रा.अक्षय पवार, प्रा.निलेश क्षीरसागर, तंत्रज्ञ अरुण कासले, संजय ठाकूर, शेख अन्सार आदींनी परिश्रम घेतले.

दि.०४.०९.२०१९ रोजी आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करताना विद्यार्थी व डॉ.लक्ष्मीकांत सोनी. या प्रसंगी उपस्थित असलेले दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य मा.विशालजी अग्रवाल व मा.अजिंक्य सोनवणे तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

## Celebration of NSS Golden Jubilee year

**Date-24.09.2019**






# दयानंदमध्ये रासेयोचा सुवर्ण महोत्सव दिन उत्साहात साजरा



**लातूर,(प्रतिनिधी):** जागतिक हवामान बदल आणि तथाकथित विकास वाटेवर वाटचाल करीत असतांना पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला असून वातावरणात सोडल्या जाणाऱ्या घातक वायूंमुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळत आहे.त्यामुळे पर्यावरणाच्या संवर्धन व संरक्षणाकडे लक्ष्य देण्याची गरज असून यासाठी सरकारी यंत्रनासोबतच युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे असे प्रतिपादन पर्यावरण अभ्यासक जेष्ठ साहित्यिक रमेश चिल्ले यांनी केले. दि.२४ रोजी दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण महोत्सव दिना निमित्ताने आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके हे होते.यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार,रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रमुख पाहुण्यांचा परिचय चंद्रकांत फड यांनी करून दिला. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांनी करून रासेयो च्या कार्याची भूमिका का विशद केली.ढासळलेल्या पर्यावरणामुळे गारपीट, दुष्काळ, चक्रीवादळ, कमी किंवा अति पाऊस आदींना तोंड द्यावे लागत असून मराठवाड्याचे वाळवंट होत चालले आहे असे मत अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली खटाळ व आकांक्षा कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रा.योगेश शर्मा यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.योगेश शर्मा,प्रा.अक्षय पवार,प्रा.निलेश क्षीरसागर ,ऋषिकेश भोसीकर,कुणाल चालीकवर,अतिष तिवारी,सागर कडेल,गीतांजली सुरवसे,भाग्यश्री उफाडे आदी व स्वयंसेवकानी विशेष पुढाकार घेतला.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

दयानंद शिक्षण संस्था,लातूर

"अ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वत:"

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

---

**महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त**
**'स्वच्छता ही सेवा' व 'फिट इंडीया अभियान'**












राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर २०१९ रोजी रॅली काढून स्वच्छता ही सेवा व फिट इंडीया अभियान राबविण्यात आले. या प्रसंगी उपस्थितांना स्वच्छता ही सेवा व प्लॅस्टिक मुक्तीची शपथ देण्यात आली.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

## महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'स्वच्छता ही सेवा' व 'फिट इंडीया अभियान'







# दयानंद महाविद्यालयात 'प्लास्टिकमुक्ती' व 'स्वच्छता ही सेवा' अभियानास प्रतिसाद

**उपक्रम** म.गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेचा अभिनव उपक्रम

**प्रतिनिधी /** ३ ऑक्टोबर

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त दि.०२ ऑक्टोबर रोजी या रॅलीचे आयोजन करून 'स्वच्छता ही सेवा' अभियान राबविण्यात आले. प्रारंभी म.गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके व प्रा. विठ्ठल जाधव यांनी म. गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी उपस्थित प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांना स्वच्छता ही सेवा आणि प्लास्टिक मुक्तीची शपथ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांनी दिली.

तद्नंतर प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील रॅली राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी दयानंद गेट पासून ते पाण्याच्या टाकीपर्यंतच्या भाजी मंडई परिसरातून काढण्यात आली. या रॅली दरम्यान स्वयंसेवकांनी त्या परिसरातील स्वच्छतेसोबतच प्लास्टिक आदि एकत्रित, संकलित करून प्लास्टिक मुक्त शहर, स्वच्छ शहर व सुंदर शहर बाबतची शपथ घेतली.

सदर रॅलीत सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, पर्यवेक्षक प्रा. सुभाष मोरे, प्रा. विठ्ठल जाधव, सह कार्यक्रमाधिकारी प्रा. अक्षय पवार, प्रा. अजय चव्हाण, प्रा. एस. एस. जाधव, प्रा. दीपक वेदे यांच्यासह रासेयो च्या स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

Fri, 04 October 2019
https://deshonnati.digitaledition.in/c/44317574



दैनिक आनंद नगरी

**लातूर नगरी**

Friday 2019/10/04

# दयानंद महाविद्यालयात स्वच्छता ही सेवा अभियान

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता म.गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त २ ऑक्टोबर रोजी रॅलीचे आयोजन करून 'स्वच्छता ही सेवा' अभियान राबविण्यात आले. प्रारंभी मा.गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके व प्रा.विठ्ठल जाधव यांनी म.गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी उपस्थित प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांना स्वच्छता ही सेवा आणि प्लास्टिक मुक्तीची शपथ राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांनी दिली.

तद्नंतर प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेन-वार यांच्या मार्गदर्शनाखाली सद-रील रॅली राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी दयानंद गेट पासून ते पाण्याच्या टाकीपर्यंतच्या भाजी मंडई परिसरातून काढण्यात आली. या रॅली दरम्यान स्वयंसेवकांनी त्या परिसरातील स्वच्छतेसोबतच प्लास्टिक आदी एकत्रित, संकलित करून प्लास्टिक मुक्त शहर, स्वच्छ शहर व सुंदर शहर बाबतची शपथ घेत-ली.सदर रॅलीत सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, पर्यवेक्षक प्रा.सुभाष मोरे,प्रा. विठ्ठल जाधव,सहकार्यक्रमाधिकारी प्रा.अक्षय पवार,प्रा.अजय चव्हाण,प्रा.एस. एस.जाधव, प्रा.दिपक वेदे यांच्यासह रासेयो च्या स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त स्वच्छता ही सेवा' व 'फिट इंडीया अभियान' अंतर्गत रॅली काढून दयानंद शिक्षण संस्था मेन गेट ते रयतु बाजार परिसरातील प्लॅस्टिक गोळा करून 'स्वच्छता अभियान' राबविण्यात राबविण्यात आले.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

दयानंद शिक्षण संस्था,लातूर

"अ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः"

राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME

## Minority Right Day : Date- 18.12.2019







# धार्मिक ऐक्यातूनच भारत महासत्ता बनू शकेल

▶ रासेयो विभागातर्फे अल्पसंख्याक हक्क दिवसानिमित्त चर्चासत्र

**लातूर** : संविधानाने भारतीय माणसाला न्याय, समता व बंधुता या बाबी दिल्या. अनेकतेतून एकता साधणारा हा भारत देश आज जागतिक पटलावर आपले नाव कोरत असतांना दिसत आहे. परंतु सद्य परिस्थितीला धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांना सोबत घेतल्याशिवाय भारताला जागतिक महासत्ता होता येणार नाही, असे प्रतिपादन प्रा. डॉ. फारूक तांबोळी यांनी केले.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करतांना चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, प्रा.आरिफ शेख, प्रा. निलेश क्षीरसागर आदींची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. सोळंके यांनी अल्पसंख्याक समुदायाला त्यांचे हक्क व कर्तव्य यांची जाणीव करून देण्याबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी निर्माण केलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. साईनाथ उमाटे यांनी केले. सूत्रसंचालन पल्लवी हाके या विद्यार्थिनीने तर आभार दिपाली खटाळ यांनी मानले. यावेळी ऋषिकेश भोसीकर, सागर कडेल, वैभव ठाकूर, योगेश देशपांडे, अभिजित सुतार, गीतांजली सुरवसे आदी उपस्थित होते.



एकता

रासेयो विभागाच्या वतीने अल्पसंख्याक हक्क दिवसानिमित्त चर्चासत्र

# धर्मिक ऐक्यातून भारताला जागतिक महासत्ता बनवता येईल-प्रा.डॉ. फारूख तांबोळी

लातूर ▪ प्रतिनिधी

[illegible]

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

दयानंद शिक्षण संस्था,लातूर

"आ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः"

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

---

**राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत 'तंबाखू व तंबाखूचे दुष्परिणाम' या विषयावर व्याख्यान व पथनाट्य**

**दि.१३ जानेवारी २०२०**








**उपक्रम** रा. से. यो. व शल्य चिकित्सक कार्यालयाकडून

### दयानंद महाविद्यालयात तंबाखू दुष्परिणामाबाबत पथनाट्यातून जनजागृती

लातूर ▪ प्रतिनिधी

येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ जानेवारी रोजी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत 'तंबाखू व तंबाखूचे दुष्परिणाम' या विषयावर डॉ. प्रज्ञा सोनवणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी डॉ. प्रज्ञा सोनवणे यांनी भारतामध्ये तंबाखू सेवनाने होणाऱ्या गंभीर आजाराचे प्रमाण वाढत असल्याचे सांगत ते कमी करण्यासाठी शाळा महाविद्यालयाने पुढाकार घेऊन जनजागृती करणे आवश्यक आहे. भारतामध्ये प्रत्येक दिवशी जळपास ५००० मुले तंबाखू चे सेवन करतात.अशा बालकांना गंभीर आजार होत असल्याचे त्यांनी सांगितले.

तत्पूर्वी शाहीर अशोक शिंदे व त्यांच्या चमूने तंबाखू हा शरिरासाठी अतिशय घातक असून तंबाखूच्या सेवनाने झालेल्या गंभीर आजारामुळे अनेक कुटूंबाची वाताहत झाल्याचे पथनाट्याच्या माध्यमातून सादरीकरण केले. या पथनाट्यातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी तंबाखू हा आरोग्यासाठी अतिशय हानिकारक असल्याचे पथनाट्यातून त्यांनी सादरीकरण केले. पथनाट्याला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके हे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. अशोक शेलगेनवार, डॉ. मनीषा आष्टेकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, डॉ. बालाजी कांबळे, डॉ. संध्या सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

**लातूर** :दयानंद महाविद्यालयात तंबाखूच्या दुष्परिणामाबाबत पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली. त्या प्रसंगी डॉ. प्रज्ञा सोनवणे, शाहीर अशोक शिंदे, डॉ. श्रीराम सोळंके, शेलगेलवार आदी.



# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

दयानंद शिक्षण संस्था,लातूर

"अ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वत:"

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

---

## जागतिक ग्राहक दिनानिमित्त 'ग्राहक संरक्षण कायदा' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम : दि.११ मार्च २०२०









लोकमत

जागतिक ग्राहक दिन : ग्राहक संरक्षण परिषदेचे राज्य उपाध्यक्ष शामसुंदर मानधना

# ग्राहकांच्या हितासाठी ग्राहक कायदा

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : ग्राहक संरक्षण कायदा हा ग्राहकांच्या हिताच्या रक्षणासाठी करण्यात आला. ग्राहकांची होणारी पिळवणूक, शोषण थांबविणे हा या कायद्याचा मूळ हेतू आहे, असे प्रतिपादन ग्राहक संरक्षण परिषद महाराष्ट्र राज्याचे वरिष्ठ उपाध्यक्ष शामसुंदर मानधना यांनी येथे केले.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जागतिक ग्राहक दिनानिमित्त 'ग्राहक संरक्षण कायद्याविषयी' जनजागृती या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम साळूंके होते. मंचावर डॉ. मनीषा आष्टेकर, प्रा. आकांक्षा भांजी, प्रा. निलेश क्षीरसागर, प्रा. अक्षय पवार आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी डॉ. साईनाथ उमाटे यांनी प्रास्ताविक केले. अभिजित औटे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी शामसुंदर मानधना म्हणाले, जो पैसा देऊन वस्तू खरेदी करतो, जो पैसे देऊन सेवा घेतो तो ग्राहक होय. राष्ट्रपतीपासून सर्वसाधारण नागरिकांपर्यंत सर्वच ग्राहकांच्या श्रेणीत येतात. एखादी खरेदी केलेली वस्तू योग्य किंमतीत, योग्य दर्जाची, योग्य मापाची मिळणे हा ग्राहकांचा मूलभूत अधिकार आहे. ग्राहक संरक्षण परिषदेचे सर्व पदाधिकारी फसवणूक झालेल्या ग्राहकांना योग्य ते मार्गदर्शन करून ग्राहकांच्या हितासाठी अग्रेसर असतात. त्यामुळे फसवणूक झाल्यास ग्राहकांनी संघटनेशी संपर्क साधावा, असे आवाहनही मानधना यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बसंत पवार यांनी केले तर आभार दीपाली खटाळ यांनी मानले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना ग्राहक संरक्षण परिषदेचे उपाध्यक्ष शामसुंदर मानधना. मंचावर प्राचार्य डॉ. श्रीराम साळुंके.

### ग्राहक बाजारपेठेतील केंद्रबिंदू : साळूंके

- अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. श्रीराम साळुंके म्हणाले, बाजार पेठेचा राजा म्हणजे ग्राहक होय. आजच्या जागतिकीकरण स्पर्धात्मक युगात ग्राहक अतिशय महत्वाचा भाग आहे. ग्राहक बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल आणि खरेदी विक्रीचा केंद्रबिंदू आहे.
- अनेकदा एक वस्तू खरेदी करा आणि दुसरी मोफत मिळवा. अमूक खरेदीवर सोने-चांदीचे नाणे मोफत मिळेल, चेहरा ओळखा आणि लाखांची बक्षिसे मिळवा, भाग्यवान विजेत्यांना कार मिळेल, अशा जाहिराती दाखवून ग्राहकांची फसवणूक केली जाते. त्यामुळे ग्राहकांची असल्या आमिषाला बळी पडू नये, असेही ते म्हणाले.

Hello Latur
Page No. 2 Mar 13, 2020
Powered by: erelego.com



# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात जागतिक ग्राहक दिन साजरा

लातूर : प्रतिनिधी

जागतिक ग्राहक दिनानिमित्त दयानंद वाणिज्य महाविद्यालय,लातूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ग्राहक संरक्षण कायदाविषयी जनजागृती या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. ग्राहक संरक्षण कायदा हा ग्राहकांच्या हिताच्या रक्षणासाठी असून ग्राहकांची होणारी पिळवणूक, शोषणापासून मुक्ती मिळवून ग्राहकांचे हित साधने हा मूळ उद्देश असल्याचे प्रतिपादन प्रांत ग्राहक संरक्षण परिषद महाराष्ट्र राज्याचे वरिष्ठ उपाध्यक्ष शामसुंदर मानधना यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. साईनाथ उमाटे, कार्यालयीन अधीक्षक रुपचंद कुरे, डॉ. मनीषा आष्टेकर, रासेयो सहकार्यक्रमाधिकारी प्रा. आकांक्षा भांजी, प्रा. निलेश क्षीरसागर, प्रा. अक्षय पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. सोळंके म्हणाले की, ग्राहक म्हणजे बाजारपेठेचा राजा आजच्या जागतिकीकरण स्पर्धात्मक युगात हा ग्राहक राजा अतिशय महत्वाचा भाग झाला आहे. ग्राहक हा बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल आणि खरेदी विक्रीचा केंद्रबिंदु आहे. वस्तु खरेदी करताना कुठल्याही आमिषाला बळी न पडता ही तिच वस्तु असल्याचं नीट पारखून घ्या असे डॉ. सोळंके म्हणाले. अभिजित औटे यांनी आपले मनोगत व्यक्त करून जनजागृती केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. साईनाथ उमाटे यांनी केले. सूत्रसंचालन वसंत पवार यांनी तर आभार दिपाली खटाळ हिने मानले.

जागतिक ग्राहक दिनानिमित्त आयोजित 'ग्राहक संरक्षण कायद्याविषयी जनजागृती' या विषयावर मार्गदर्शन करताना ग्राहक संरक्षण परिषद, महाराष्ट्र प्रांतचे उपाध्यक्ष मा.श्यामसुंदर मानधना व मा.अभिजित औटे. याप्रसंगी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीराम सोळंके व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.साईनाथ उमाटे.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

## राज्यस्तरीय सुदृढ युवक, श्रेष्ठ भारत या श्रमसंस्कार शिबिरात सहभाग : दि.२४.०२.२०२० ते ०१.०३.२०२०






कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दि.२४ फेब्रुवारी ते ०१ मार्च २०२० दरम्यान ता.साक्री, जि.धुळे येथे सुदृढ युवक, श्रेष्ठ भारत या संकल्पनेवर आधारीत राज्यस्तरीय श्रमसंस्कार शिबीर आयोजित केले. सदरील शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड, रासेयो संचालक डॉ.शिवराज बोकडे व संघ व्यवस्थापक डॉ.साईनाथ उमाटे.



महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, रासेयो कक्ष, मुंबई व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव आणि सि.गो.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि.धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय श्रमसंस्कार शिबीर- 'सदृढ युवक, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेवर आधारीत दि.२४ फेब्रुवारी ते ०१ मार्च २०२० या सात दिवशीय शिबिराच्या समारोप प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना व प्रमाणपत्र स्विकारताना संघ व्यवस्थापक डॉ.साईनाथ उमाटे. या प्रसंगी प्राचार्य डॉ.राजेंद्र सोनवणे, समारोपकर्ते डॉ.आनंद पाटील, प्रा.विश्वास भामरे, डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण व डॉ.ज्योती वाकोडी.

# DAYANAND COLLEGE OF COMMERCE, LATUR

## NSS ATR 2019-20

## NSS ANNUAL ACTIVITY

दयानंद शिक्षण संस्था,लातूर

"अ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः"

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

## राज्यस्तरीय सुदृढ युवक, श्रेष्ठ भारत या श्रमसंस्कार शिबिरात सहभाग : दि.२४.०२.२०२० ते ०१.०३.२०२०








### डॉ. साईनाथ उमाटे यांचा उत्कृष्ट संघव्यवस्थापक म्हणून सन्मान

**लातूर : प्रतिनिधी** दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांना उत्कृष्ट संघव्यवस्थापक म्हणून सन्मानीत करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, कक्ष मुंबई ,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि विद्या विकास मंडळाचे सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री जि. धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय 'सुदृढ युवक, श्रेष्ठ भारत' श्रमसंस्कार या सात दिवसीय निवासी शिबिरामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संघाने यशस्वी सहभाग नोंदवला. या शिबिरात चार स्वयंसेवक व सहा स्वयंसेविका आणि एक कार्यक्रमाधिकारी यांनी सहभाग घेतला होता. या संघास दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांना उत्कृष्ट संघव्यवस्थापक तसेच उत्कृष्ट स्वयंसेविका गितांजली सुरवसे (दयानंद वाणिज्य महाविद्यालय,लातूर ), विशाखा साळी (पीपल्स महाविद्यालय, नांदेड) यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, रासेयो संचालक डॉ. शिवदास बोकडे, विद्यार्थी विकास परिषदेचे डॉ. ज्ञानेश्वर मुंढे यांनी स्वयंसेवक, स्वयंसेविका व संघव्यवस्थापकाचे अभिनंदन केले.



दैनिक आनंद नगरी

लातूर नगरी

Wednesday 2020/03/04

### दयानंदच्या डॉ. साईनाथ उमाटे यांचा उत्कृष्ट संघव्यवस्थापक म्हणून सन्मान

**लातूर,प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या उच व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, कक्ष मुंबई ,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि विद्या विकास मंडळाचे सी.गो. पाटील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री ता.साक्री जि. धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ फेब्रुवारी ते ०१ मार्च २०२० दरम्यान आयोजित राज्यस्तरीय 'सुदृढ युवक, श्रेष्ठ भारत ' श्रमसंस्कार या सात दिवसीय निवासी शिबिरामध्ये स्वामी राम ानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संघाने यशस्वी सहभाग नोंदवला. या शिबिरात चार स्वयंसेवक व सहा स्वयंसेविका आणि एक कार्यक्रमाधिकारी यांनी सहभाग घेतला होता.या संघास दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ उमाटे यांना उत्कृष्ट संघव्यवस्थापक तसेच उत्कृष्ट स्वयंसेविका गितांजली सुरवसे, विशाखा साळी (पीपल्स महाविद्यालय, नांदेड) यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले ,प्र-कुलगुरू डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन, रासेयो संचालक डॉ. शिवदास बोकडे, विद्यार्थी विकास परिषदेचे डॉ.ज्ञानेश्वर मुंढे यांनी स्वयंसेवक ,स्वयंसेविका व संघव्यवस्थापकाचे अभिनंदन केले.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, रासेयो कक्ष, मुंबई व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव आणि सि.गो.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि.धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय श्रमसंस्कार शिबीर- 'सदृढ युवक, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेवर आधारीत दि.२४ फेब्रुवारी ते ०१ मार्च २०२० हे सात दिवशीय शिबिर यशस्वीरित्या संपन्न करून आल्यानंतर स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड चे कुलगुरू मा.डॉ.उद्धवजी भोसले व प्र.कुलगुरू मा.डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यांनी उत्कृष्ट संघ व्यवस्थापक म्हणून सन्मानीत झाल्याबद्दल संघ व्यवस्थापक डॉ.साईनाथ उमाटे यांचे प्रमाणपत्र देऊन अभिनंदन केले. तसेच सहभागी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव केला. या प्रसंगी स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड चे संचालक मा.डॉ.शिवराजजी बोकडे व विद्यार्थी विकास परिषदेचे डॉ.ज्ञानेश्वर मुंढे.